# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १२९ वा ❑ भारतीय सौर दिनांक १० आषाढ शके १९४८, बुधवार दि.०१ जुलै २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### स्त्री-पुरुष समानतेचा नवा अध्याय; पतीकडूनही वटवृक्षाला प्रदक्षिणा

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

वटपौर्णिमेच्या दिवशी केवळ पत्नीनेच नव्हे, तर पतीनेही वटवृक्षाची पूजा करून एकमेकांच्या उत्तम आरोग्यासाठी व दीर्घायुष्यासाठी उपवास करण्याची सुंदर प्रथा महाराष्ट्रात रुजली आहे. या प्रथेमुळे पती-पत्नीतील प्रेम, परस्पर सन्मान आणि समानतेचा संदेश समाजात पोहोचत आहे.

जुन्या रूढीनुसार महिला वडाच्या झाडाला प्रदक्षिणा घालून सात जन्म हाच पती मिळावा अशी प्रार्थना करतात. आजच्या आधुनिक काळात पुरुषही या व्रतात सहभागी होत आहेत. अनेक ठिकाणी पती-पत्नी एकत्र येऊन वटपौर्णिमेची पूजा करतात  आणि एकमेकांच्या साथीची कामना करतात.आधुनिक विचार: पतीही पत्नीसाठी व्रत ठेवून स्त्री-पुरुष समानतेचा एक आगळावेगळा अध्याय लिहित आहेत.

वटपौर्णिमेनिमित्त सर्वसाधारणपणे पत्नी आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी वडाच्या झाडाची पूजा करून व्रत करताना दिसतात. मात्र, सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेल्या १७ वर्षांपासून एक वेगळी आणि आगळी परंपरा जपली जात असून, येथे पुरुष आपल्या पत्नीच्या दीर्घायुष्यासाठी वडाची पूजा करत वटपौर्णिमा साजरी करतात.

पुरुषप्रधान संस्कृतीच्या परंपरेला छेद देत पतीने पत्नीसाठी वडपूजन करणे हा एक क्रांतिकारी आणि कौतुकास्पद बदल आहे.

या अनोख्या उपक्रमात सहभागी झालेल्या पुरुषांनी पत्नीच्या त्यागाचा सन्मान करण्यासाठी हे व्रत करत असल्याचे सांगितले. ‘‘घरातील प्रत्येकाची काळजी घेणारी, सर्वांच्या आधी उठून दिवसाची सुरुवात करणारी आणि सर्वजण झोपल्यानंतरही घराची जबाबदारी सांभाळणारी पत्नी कुटुंबासाठी आयुष्यभर त्याग करत असते. ती आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी वटपौर्णिमेचे व्रत करते. तिच्या या त्यागाचा सन्मान म्हणून आम्हीही तिच्या दीर्घायुष्य आणि उत्तम आरोग्यासाठी वडाची पूजा करतो,’’ अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

गेल्या १७ वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेल्या या परंपरेला स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, समाजात स्त्री-पुरुष समानतेचा आणि परस्पर सन्मानाचा संदेश देणारा हा उपक्रम म्हणून त्याकडे पाहिले जात आहे.

दरम्यान, सिंधुदुर्गातील ही आगळीवेगळी वटपौर्णिमा राज्यभर चर्चेचा विषय ठरत असून, पत्नीच्या त्यागाचा गौरव करणारी ही परंपरा अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

वटपौर्णिमेला ज्याप्रमाणे स्त्रिया पतीच्या दीर्घायुष्यासाठी वडाची पूजा करतात, त्याचप्रमाणे पुरुषांनीही पत्नीच्या त्यागाचा आणि प्रेमाचा गौरव करण्यासाठी वडाची  पूजा करण्याची ही नवी परंपरा खरोखरच कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे.ही बदलती परंपरा समाजात  सकारात्मक बदल घडवून आणत आहे.केवळ स्त्रीनेच पतीसाठी व्रत करावे ही जुनी धारणा मोडून पुरुषही पत्नीसाठी व्रत करत आहेत. लग्न म्हणजे दोघांचाही समान सहभाग आणि एकमेकांबद्दलचा आदर ,सिद्ध होतो.स्त्री घरासाठी आणि कुटुंबासाठी करत असलेल्या कष्टांची पुरुषांना जाणीव होत आहे. पत्नीच्या प्रेमाचा जाहीरपणे आदर केल्याने कौटुंबिक नातेसंबंध अधिक घट्ट होतात. घरातील पुरुष जेव्हा अशी पावले उचलतात, तेव्हा मुलांवरही स्त्री-पुरुष समानतेचे चांगले संस्कार होतात.अंधश्रद्धा किंवा केवळ एकतर्फी प्रथांऐवजी या सणांना आता परस्पर प्रेमाचे आधुनिक स्वरूप मिळत आहे.हा बदल म्हणजे केवळ एक कृती नसून, बदलत्या आधुनिक समाजाची आणि परिपक्व नात्यांची एक सुंदर सुरुवात आहे.

# बालगंधर्व नाट्यसंगीत स्पर्धेत पुण्याचे निधी, सार्थक यांची बाजी

ज्योतिर्मय साहित्य

मुंबई – स्वामीराज प्रकाशन आणि पल्लवी फाउंडेशन यांनी आयोजित केलेल्या ‘‘बालगंधर्व नाट्यसंगीत स्पर्धेत‘‘ पुणे येथील निधी घारे हिने प्रथम, तर सार्थक बावीकर याने द्वितीय पारितोषिक पटकावले आहे. बदलापूर येथील सोजी मॅथ्यू हिने तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.

बालगंधर्व यांच्या १३८ व्या जयंती निमित्त स्वामीराज प्रकाशन आणि पल्लवी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही देशपातळीवरील स्पर्धा आयोजित केली होती. देशाच्या विविध शहरातील तब्बल ९७ स्पर्धकांनी यात सहभाग घेतला. त्यातील २७ जणांची उपांत्य फेरीसाठी निवड झाली.




पु ल देशपांडे कला अकादमी येथे २६ जून रोजी या स्पर्धेची उपांत्य आणि अंतिम फेरी संपन्न झाली. अंतिम फेरीसाठी नऊ स्पर्धकांची निवड झाली. अंतिम फेरीचे परीक्षण संगीत नाटक अकादमी पुरस्कार विजेते ज्येष्ठ गायक अभिनेता मुकुंद मराठे, ज्येष्ठ गायिका अभिनेत्री बकुळ पंडित आणि ज्येष्ठ गायक अभिनेता ज्ञानेश पेंढारकर यांनी केले. पद्मश्री पुरस्कार सन्मानित ज्येष्ठ अभिनेत्री नयना आपटे, आमदार प्रमोद जठार यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी स्पर्धेचे संयोजक तपस्या नेवे, अमेय रानडे, आयोजक रजनीश राणे, भाऊ कोरगावकर, शलाका कोरगावकर, विवेक माणगावकर, दिनेश पिळगावकर, प्रदीप चित्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेचा सविस्तर निकाल पुढीलप्रमाणे...

अरविंद पिळगावकर स्मृती प्रथम पुरस्कार २५००० रुपये आणि सन्मानचिन्ह – निधी घारे (पुणे), सीताराम गणपती मणेरकर स्मृती द्वितीय पुरस्कार १५००० रुपये आणि सन्मानचिन्ह – सार्थक बावीकर (पुणे), सुनीता प्रदीप चित्रे स्मृती तृतीय पारितोषिक १०००० रुपये आणि सन्मानचिन्ह – सोजी मॅथ्यू (बदलापूर), शरद आचार्य स्मृती उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी ३००० रुपये आणि सन्मानचिन्ह – चैतन्य फाटक (डोंबिवली), तन्वी गोरे (डोंबिवली), शिवम रायकर (फोंडा/गोवा), सार्था गवाणकर (रत्नागिरी)

# डॉक्टर्स डे : पांढऱ्या कोटातील ईश्वराचे रूप

ज्योतिर्मय साहित्य

आज ०१ जुलै – राष्ट्रीय डॉक्टर्स डे,

१ जुलै १९९१ पासून इंडियन मेडिकल असोसिएशन () च्या पुढाकाराने आपल्या देशात डॉक्टर्स डे साजरा होतो. बंगालचे माजी मुख्यमंत्री, भारत रत्न डॉ. बिधानचंद्र रॉय यांची जयंती आणि पुण्यतिथी एकाच दिवशी – १ जुलै रोजी असल्याने, त्यांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून हा दिवस डॉक्टर्स डे म्हणून साजरा केल्या जातो.

**डॉक्टर म्हणजे काय?**

हा प्रश्न एखाद्या मृत्यूच्या दारातून परत आलेल्या माणसाला विचारा...

संततीच्या प्रतीक्षेत आयुष्य खर्ची घातलेल्या जोडप्याला विचारा, जेव्हा डॉक्टरांच्या उपचारानंतर त्यांच्या अंगणात बाळाचे पाऊलं पडतात तेव्हा...

अपघातात तुटलेला हात शस्त्रक्रियेनंतर पुन्हा काम करू लागतो, तेव्हा त्या कारागिराच्या डोळ्यातील कृतज्ञता विचारा...

वर्षानुवर्षे कोमात असलेला मुलगा, डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांनंतर जेव्हा पहिल्यांदा आई म्हणून साद घालतो, तेव्हा त्या माऊलीच्या काळजात उठणाऱ्या कल्लोळाला विचारा...

जन्मापासून अंधारात जगणाऱ्या जीवाला जेव्हा पहिल्यांदा सूर्य दिसतो, तेव्हा त्या प्रकाशाच्या आनंदाला विचारा...

डॉक्टर म्हणजे काय, याचे उत्तर शब्दांत नाही, तर त्या क्षणांत दडलेले असते.

कोरोना काळातील रणझुंजार योद्धे पाच-सहा वर्षांपूर्वी कोरोनाने जेव्हा संपूर्ण जगाला वेठीस धरले होते, तेव्हा पांढरा कोट घालून मृत्यूशी दोन हात करणारे डॉक्टरच होते. कुटुंब, लेकरं, घरदार विसरून पी पी  ई  किटच्या घामट कोंदणात रात्रंदिवस रुग्णसेवा करणारे तेच होते. रुग्णांना वाचवता वाचवता स्वतःचा श्वास कायमचा थांबवणाऱ्या शेकडो डॉक्टरांचे बलिदान हा देश कधीही विसरू शकत नाही. ते डॉक्टर नव्हते, काळावर मात करणारे देवदूत होते.

आपली संस्कृती डॉक्टरांना वैद्यो नारायणो हरि: मानते. पण एखाद्या रुग्णाचा मृत्यू झाला की डॉक्टरांवर हात उचलला जातो, हे दृश्य कोणत्याही सुसंस्कृत समाजाच्या कपाळावरचा व्रण आहे.

हे अमानुष, वेदनादायक आणि संतापजनक आहे.

शरीराच्या, मनाच्या जखमा भरणाऱ्या




हातांनाच आपण जखमी करायचे? डॉक्टर आहेत म्हणून आपण आहोत.

नवे विषाणू, नवे आजार रोज जन्म घेत



आहेत. संकटाच्या काळोखात डॉक्टर नावाचा एकच दिवा आपल्याला दिसतो. मग गरज सरो, वैद्य मरो ही वृत्ती का? ही विचारसरणी आता बदलायलाच हवी.

**विचार करा... डॉक्टर नसते तर?**

ही नुसती कल्पनाच अंगावर काटा आणते. जगणे अशक्य झाले असते. आज एकच शपथ घेऊया, माझ्यामुळे कोणत्याही डॉक्टरच्या डोळ्यात कधीही पाणी येणार नाही. माझ्या हातून त्यांचा कधीही अपमान होणार नाही. नीट  परीक्षा पास होऊन मेडिकलला प्रवेश मिळवणे हीच एक तपश्चर्या आहे. त्यानंतर एम डी,एम आदीचा खडतर प्रवास. रात्रीच्या रात्री जागून, कुटुंबापासून दूर राहून, असंख्य परीक्षा देत जेव्हा एखादा तरुण/तरुणी डॉक्टर होते, तेव्हा त्यांच्या आई-बाबांच्या डोळ्यातील आनंद हा जगातील सर्वात सुंदर सोहळा असतो. पण आज डॉक्टरांवरील हल्ल्यांच्या बातम्या वाचून जर उद्याची पिढी या पवित्र सेवेकडे पाठ फिरवू लागली, तर त्याहून मोठे दुर्दैव कोणते? ही भीती वाटते म्हणूनच हा लेखनप्रपंच. माझ्या आयुष्यातील देवदूतांना कृतज्ञ वंदन  माझ्या आणि माझ्या कुटुंबाच्या कठीण काळात धावून आलेल्या, मायेने औषधोपचार करणाऱ्या प्रत्येक डॉक्टरचा मी जन्मभर ऋणी आहे.

विनम्र आदरांजली : स्व. डॉ. बिडकर, छ. संभाजीनगर,स्व. डॉ. श्रीधर साने, परभणी   मनः पूर्वक कृतज्ञता : डॉ. भारत लाड, परभणी, डॉ. अनिल दिवाण, परभणी डॉ. श्रीपाद नाईक, परभणी, डॉ.आनंद कुलकर्णी, परभणी डॉ. विलास देशमुख, परभणी  डॉ. विलास मगरकर, संभाजीनगर, डॉ. कल्पना कुलकर्णी, सेलू,  डॉ. उषा कदम, खामगाव, डॉ शुभांगी व डॉ प्रमोद भाले संभाजीनगर, डॉ. प्रवरा जोशी, संभाजीनगर, डॉ. कल्पना भांगे, पुणे, डॉ. अनिल दुधभाते, पुणे, डॉ. अंधारे, पुणे, डॉ. अश्विनी वर्पे, पुणे तुम्ही सर्व माझ्या आयुष्यात आलात, हेच माझे परमभाग्य. तुम्ही दिलेली सेवा मी कधीच विसरू शकणार नाही. जगभरातील आणि भारतातील तमाम डॉक्टर बंधू-भगिनींना राष्ट्रीय डॉक्टर्स डेच्या कोटी कोटी शुभेच्छा! तुमच्या त्यागाला, निष्ठेला आणि सेवाव्रताला माझे शतशः नमन.









# जात्यावरच्या ओव्या......

अरे पड ना पाण्या
निरोप देते वार्यासंग
ये, रे, बिगीबिगी,
बरकत घेऊन पुढमाघ ||७१९||

अरे पड ना पाण्या
तुच माय तुच बाप
कशी येईल घरात
लक्ष्मी ओलांडून माप? ||७२०||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ४५

ज्योतिर्मय साहित्य

**जयाचेनि संगे समाधान भंगे ।**
**अहंता अकस्मात येऊनि लागे ।**
**तये संगतीची जनी कोण गोडी ।**
**जिये संगतीने मति राम सोडी ।४५।**

अर्थ : ज्यांच्या संगतीत मनाचे समाधान नष्ट होते आणि अहंकार वाढीस लागतो अशा लोकांची संगत चांगली नाही. ज्यांच्या संगतीत आपण बुद्धीने परमेश्वरापासून दूर जातो अशांच्या संगतीत राहण्यात गोडी ती कोणती ?

विवेचन :


या श्लोकात समर्थांनी अप्रत्यक्षपणे सत्संगतीची महती सांगितली आहे. व्यवहारात आणि परमार्थातही संगत अतिशय महत्त्वाची असते. आपण ज्याच्या संगतीत राहतो त्याचे गुण किंवा दोष आपल्याला लागतात. संत तुकाराम महाराज म्हणतात

ढेकणाच्या संगे हिरा जो भंगला
कुसंगे नाडला साधू तैसा ।।



हिरा अत्यंत कठीण असतो परंतु त्याला ढेकणाचे रक्त लागले की तो भंग पावतो असे म्हणतात. त्याप्रमाणेच दुर्जनांच्या संगतीत राहिले की साधू देखील बिघडतो एवढे संगतीचे महत्त्व आहे. संगती संग दोषेंण असे म्हटले जाते. म्हणूनच मोरोपंत म्हणतात,'' सुसंगती सदा घडो, सुजन वाक्य कानी पडो.''

व्यसनी माणसाच्या सतत सहवासात राहिल्यामुळे आपल्यालाही व्यसन लागण्याची शक्यता असते. सतत खोटे बोलणाऱ्या व्यक्तीच्या सहवासात जर आपण राहत असू तर आपल्याला तसे वागणे योग्यच वाटायला लागते. श्रीमंत व्यक्तीच्या सहवासात राहिल्यानंतर आपल्यालाही तसेच श्रीमंत व्हावेसे वाटते. या सगळ्या अशा प्रकारच्या संगतीत आपण भगवंताला मात्र विसरतो आणि आपला अहंकार मात्र वाढत असतो. मी पणाला खतपाणी मिळते.




संत नामदेवराय म्हणतात
अहंकाराचा वारा । न लागो राजसा ।
माझिया विष्णुदासा । भाविकांसी ।।

क्षमा हे वीराचे भूषण आहे. नम्रता हे विद्येचे भूषण आहे. गर्व नसणे हे श्रीमंतीचे भूषण आहे. परंतु ज्या माणसांना हे माहिती नसते त्यांचा अहंकार बळावतो. अशांच्या संगतीत राहिल्याने आपलाही अहंकार आपण जोपासत राहतो. संत कबीर यांचा एक दोहा फार सुंदर आहे...

'बडें बडाई न करे, बडे न बोले बोल ।
हिरा मुख से न कहे, लाख टका मम मोल ।।
''मैं मैं'' बडी बलाई है, सके निकल तो निकले भाग । कहे कबीर कब लग रहै, रुई लपेटी आग ।।'

समर्थ म्हणतात, ''प्राप्त झालेले ज्ञान 'अहंकारामुळे' नष्ट होते.'' अहंकारामुळे काम, क्रोध आदी दुर्गुण वाढीस लागतात. वैज्ञानिक आणि भौतिक प्रगतीमुळे अनेक प्रगत राष्ट्रांमध्ये आर्थिक सुबत्ता आहे. परंतु शांतता आणि समाधान मात्र हरवलेले दिसते. आपल्याला त्यांची प्रगती जरी आकर्षक वाटली तरी त्यातील फोलपणा समजून घेतला पाहिजे.

तात्पर्य, ज्या संगतीने भगवंताचे नाम मुखात येऊन त्याची गोडी लागते अशी संगत म्हणजे सत्संगत ! सत्संगती धरली तर सद्गुणांची वृद्धी होऊन भगवद्कृपा प्राप्त होते.

**(क्रमशः)**




ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏

# || संजय उवाच... ||




@संजय काव्या पुणे 7743918559

✍️अनुभव

काही जण ठेच लागल्यावर शहाणे होतात, काही जण शिकून सवरून शहाणे होतात, कसे शहाणे व्हावयाचे ते सर्वस्वी आपल्यावर अवलंबून असते पण अनुभवाची शिदोरी सर्वांत मोठं शिक्षण आहे.

# परमेश्वराच्या भक्तीचा राजमार्ग



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

परमात्म्याची ज्याने ओळख होते ते ज्ञान. अन्य ज्ञान ते केवळ शब्दांचे अवडंबरच होय. परमात्मा नुसत्या ज्ञानाने ओळखता येणार नाही, भक्ती केल्यानेच तो ओळखता येईल. जसे गाय आली म्हणजे तिच्या मागोमाग तिचे वासरू येते, त्याला निराळे बोलवावे लागत नाही, त्याप्रमाणे, भक्ती केल्यावर ज्ञान आपोआपच मागे येते.

आता, भक्ती कशी करावी हे पाहिले पाहिजे. जो देवापासून विभक्त राहात नाही तो भक्त. नुसते देहाला कष्ट दिल्याने वैराग्य प्राप्त होत नाही, तर ज्या स्थितीत आपल्याला देव ठेवील त्या स्थितीतच आनंदाने राहणे म्हणजे वैरागी होणे. सुखात ठेवले तर आासक्तीशिवाय राहिले म्हणजे झाले. वैराग्य प्राप्त व्हायला प्रपंच सोडावा लागत नाही. साधुसंत प्रपंच सोडून राहात नाहीत, किंबहुना, ते आपल्यापेक्षाही प्रपंच उत्तम करतात; पण मनातून त्यांना त्यात आसक्ती नसते. मनाने आतून जो आसक्तिरहित झाला त्यालाच खरे वैराग्य आले असे होते. अंगाला राख फासून राहिले म्हणजे वैराग्य येत नाही; तर देह प्रारब्धावर, भगवंताच्या भरवशावर टाकून राहणे हेच वैराग्य होय. कशाचीही हाव न धरता, जी स्थिती प्राप्त होईल तीतच आनंदाने राहणे म्हणजे परमेश्वराची इच्छा मानणे होय. आणि तसे राहिले म्हणजे आपोआपच भक्त होतो. तसे व्हायला राजमार्ग म्हणजे नामस्मरण करणे. नामस्मरणावर विश्वास ठेवावा आणि ते विश्वासाने घेत जावे. गुरूने जे नामस्मरण करायला सांगितले असेल तेच करीत राहावे. आणि त्यातच त्याला पाहावे, म्हणजे दिसेल ते गुरुरूपच दिसू लागते. असे झाले म्हणजे सर्व ठिकाणी गुरू दिसू लागतो; चांगल्या दिवाणखान्यात असलो म्हणजे गुरू दिसतो आणि वाईट ठिकाणी असलो तर तो दिसत नाही असे नाही. सर्व ठिकाणी गुरुरूप दिसू लागल्यावर जगात वाईट असे काहीच राहात नाही, कारण मग वाईटाला जागाच राहात नाही. नामस्मरण हेच साधन आहे आणि साध्यही तेच आहे. दुसऱ्या कुणीही काहीही सांगितले तरी त्यावर विश्वास ठेवू नये. नामस्मरण हेच सत्य. त्यावर इतका विश्वास ठेवा, की त्याशिवाय जगात दुसरे काही नाही. एवढा विश्वास अंगी बाणल्यावर देव काही लांब नाही, तुमच्याजवळ आहे. प्रपंचावर जी आसक्ती करता ती तिथून काढून परमार्थावर ठेवा, म्हणजे परमार्थ कठीण नाही. गुरूला अनन्य शरण जाणे म्हणजेच आपला मीपणा नाहीसा करणे होय. मीपणा समूळ मेल्याशिवाय अनन्य शरण जाता येणार नाही. मीपणा हा गुरूने सांगितलेले नामस्मरण करीत राहिल्याने जातो. म्हणून सतत नामस्मरण करीत असावे. वैराग्य हे वृत्तीत असते. भगवंताने जे दिले त्यात समाधान असून, इतर काही हवे असे न वाटणे, हे वैराग्य.



# || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर, पुणे

## श्री हनुमानांची स्वभाव वैशिष्ट्ये

माणसाची पारख :

जे मायाजन्य कर्म बंधन तोडून मोक्ष देतात! यांना पाहून माझ्या मनात अपार प्रेम दाटून येत आहे. याचे कारण काय असावे ?

सन्मार्गा वरून सतत चालणाऱ्या हनुमान यानंतर त्यांच्या सन्मुख गेले आणि त्यांचे अतिशय मृदू भाषेत स्वागत केले, ते म्हणाले आपले या पर्वतावरील आगमन शुभ असो.

हे एका उत्तम हेराचे सुद्धा लक्षण आहे. शत्रू पक्षा कडील बित्तमबातमी यथार्थपणे जो काढून आणतो त्यासाठी त्याला स्वतःला माणसाची पारख असणे खूप महत्त्वाचे असते. केवळ काही क्षणात त्यांच्या देहबोली वरून व योग्य ती तर्कसंगत लावून हनुमानांनी या दोघांना हेच सुग्रीवाचे दुःख हरण करणारे योग्य पुरुष आहेत. याचा निवाडा केला. आपल्या मृदू वचनाने राम लक्ष्मण यांनाही आपल्याकडे त्यांचे मन वळवून सुग्रीवाशी मैत्री करविली . राम व लक्ष्मण सीतेचा शोध घेण्यासाठी आमच्याकडे हजारो वानर आहेत ते शोध घेतील असे आश्वासन दिले. अशा रीतीने हनुमान आणि प्रथम संधी करार करवीला.

हनुमानाचे असंख्य गुण आहेत त्यातील केवळ एक गुण आपण इथे निवडला आहे.

*बजरंग बली की जय*




# पाणी पिण्यासाठी तांब्याची बाटली वापरावी की स्टीलची?

ज्योतिर्मय साहित्य

दिवसभर घराबाहेर असताना तहान भागवण्यासाठी आपण पाण्याची बाटली कायम आपल्यासोबतच ठेवतो. आता ही पाण्याची बाटली नेमकी कोणत्या मटेरियलपासून तयार केलेली असावी असा प्रश्न अनेकांना पडतोच. प्रत्येकजण आपापल्या गरजेनुसार तांबे, स्टील, काच किंवा प्लॅस्टिकच्या मटेरियलपासून तयार झालेल्या पाण्याच्या बाटल्यांचा वापर करतात. परंतु प्रश्न जेव्हा आरोग्याचा येतो तेव्हा नेमकं यातील कोणत्या मटेरियल पासून बनलेल्या पाण्याच्या बाटल्यांचा वापर करावा हे आपल्याला समजत नाही

परंतु गेल्या काही वर्षात, तांबे आणि स्टीलपासून तयार केल्या जाणाऱ्या पाण्याच्या बाटल्या वापरण्याचा ट्रेंड फारच वाढला आहे.

आजकाल प्रत्येकजणांच्या बॅगेत स्टील किंवा तांब्यापासून तयार केलेल्या पाण्याच्या बाटल्या दिसतात. परंतु यातही नक्की तांबे किंवा स्टील या दोघांपैकी कोणत्या धातूपासून तयार केलेल्या बाटलीचा वापर करावा ते पाहूयात.

पाणी पिण्यासाठी तांब्याची बाटली वापरावी कि स्टीलची...?

आयुर्वेदानुसार तांब्याच्या भांड्यात पाणी पिणे खूप फायदेशीर मानले जाते. तांब्याच्या भांड्यात ठेवलेल्या पाण्यात नैसर्गिकरित्या अँटी-इन्फेक्शन (जिवाणूविरोधी) गुणधर्म तयार होतात.

तांब्यामध्ये अद्वितीय गुणधर्म असतात, जे जीवाणू मारण्यास आणि शरीराला हानिकारक घटकांपासून वाचवण्यास मदत करतात. तांब्याच्या भांड्यातील पाणी पिल्याने पचनक्रिया सुधारते, आतड्यांचे आरोग्य सुधारते आणि शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत होते.

तांब्याच्या भांड्यातील पाणी अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध असते, जे शरीरातील पेशींचे संरक्षण करतात आणि वृद्धत्वाची प्रक्रिया मंद करतात.

याचबरोबर, थायरॉईड आणि हार्मोनल संतुलन राखण्यासाठी देखील उपयुक्त आहे आणि मानसिक आरोग्यावर सकारात्मक परिणाम करू शकते. तांब्याच्या बाटलीत पाणी ६ ते ८ तास ठेवले जाते, त्यानंतर हे पाणी आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. परंतु, तांब्याची बाटली वेळोवेळी स्वच्छ करणे खूप गरजेचे असते. ती लिंबू आणि मीठ किंवा व्हिनेगरने धुवावी, जेणेकरून त्यात घाण जमा होणार नाही आणि ऑक्सिडेशनची प्रक्रियाही मंद होईल. ती पूर्णपणे सुकल्यानंतरच वापरावी.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

स्टीलच्या बाटलीतून पाणी पिणे देखील एक चांगला पर्याय मानला जातो. त्यात रासायनिक घटक नसतात आणि ते पाणी दूषित करत नाहीत किंवा त्याची चव बदलत नाहीत. स्टेनलेस स्टीलला गंज लागत नाही आणि ते दीर्घकाळ टिकणारा, मजबूत आणि सुरक्षित असा धातू असतो. त्यापासून बनवलेल्या बाटल्या पर्यावरणासाठीही चांगल्या असतात, कारण स्टेनलेस स्टील १००% पुनर्वापर करण्यायोग्य आहे.

याशिवाय, स्टीलच्या बाटल्या खूप सहज स्वच्छ करता येतात. या बाटल्यांमध्ये इन्सुलेशन असते, ज्यामुळे पाणी जास्त काळ थंड किंवा गरम राहते. मात्र, काही स्टीलच्या बाटल्यांमध्ये निकेल असते, ज्यामुळे काही लोकांना ऍलर्जी होऊ शकते. त्यामुळे स्टीलची बाटली खरेदी करताना ती चांगल्या दर्जाची आहे याची खात्री करणे महत्त्वाचे असते.

तांबे की स्टील, नेमका कोणत्या बाटलीचा वापर करावा...?

जर तुम्ही आयुर्वेदिक फायदे आणि सूक्ष्मजंतूविरोधी गुणधर्म असणारी बाटली वापरु इच्छित असाल, तर तांब्याची बाटली तुमच्यासाठी योग्य पर्याय असू शकतो. पण जर तुम्हाला दीर्घकाळ टिकणारी आणि पर्यावरणपूरक बाटली हवी असेल, तर स्टीलची बाटली एक उत्तम पर्याय आहे.

***




## "तो श्री राम दाता, नको चिंता

माणसाचे जीवन किंवा आयुष्य जसे अनेक चढणेऊताराचे आहे, तसेच ते नाना रंगाचे आहे असे आपण म्हणतो. ईथे रंग,तरंग लाट याविषयी लक्षात घ्या...
"पाणी"हा शब्द मराठीत वाक्प्रचारात "अठरा अर्थानी" वापरला आहे.त्यावर लेख तयार होईल. तसेच येथे जीवनाचे रंग म्हणजेच भावभावना, अनुभूती आणि सुख दुःखाच्या लाटा होय. म्हणजे जीवनात बालपण, तारूण्य व गृहस्थाश्रम वृद्धत्व येते तसेच सुखदुःखाचे प्रकार आहेत. लहानपणाचे
सुख व तरूण वयाचे सुख वेगळं. तर म्हातारपण वेगळ.
म्हणून सुखसमाधानाची परिभाषा करणे अवघड. तर तणाव निराशा आली तरी निष्क्रीय होऊ नये. आनंद जास्त सुख आहे म्हणून कोणी नंगेनाच करून त्रास देऊ नये! आपले कर्तव्य प्रयत्न सुरू ठेवावे असे संतसांगतात. फलाबाबत किंवा परिणामाबाबत विचलित होऊ नका.कारण संपूर्ण जग विरोधाभासाने भरलेले आहे! असे हे सुखदुःखाचे गणित आहे त्याची वेगवेगळी रूपे
आहेत,म्हणून चित्ती असो द्यावे समाधान!!स्वस्थ राहा मस्त राहा सुख दुःखाचे तरंग माणसा - माणसाचे वाचत चला! आपला दिवस आनंदी जावो हिच गुरू चरणी प्रार्थना.

# प्रभातपुष्प

## षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### पावसाच्या सरी

पावसाच्या सरींनी सर्वत्र
हिरवळ पसरलेली पाहून
आनंद होतो मनाला
बळीराजा शेतीच्या कामाचे
नियोजन करुन पहा
पेरणीसाठी सज्ज झाला

पावसाच्या सरी येताच
हिरवळीची मऊ चादर
वसुंधरेने छान पांघरली
अंगी नव ऊर्जा
कामात आला जोश
निसर्गाची जादू अनुभवली

# शहराचे नागरिक हेच वारसास्थळांचे ब्रँड ॲम्बेसेडर-डॉ. संजय पाईकराव

## 'शहरानामा'च्या हेरिटेज वॉकमध्ये उलगडले 'अवलोकितेश्वर' शिल्पाचे सौंदर्य

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – शहरातील औरंगाबाद लेणी ही अत्यंत महत्त्वाची लेणी आहे. जगातील दोन अद्भुत शिल्प इथल्या लेणी क्रमांक सातमध्ये बघायला मिळतात. दुर्दैवाने या जगविख्यात वारसास्थळाची माहिती आपणच ठेवत नाही. शहराचे नागरिक, लहान मुल ही सुद्धा वारसास्थळांचे ब्रँड ॲम्बेसेडर असतात. आपणच आपल्या लेणीची माहिती इतरांना द्यायला हवी, असे आवाहन मुर्ती व शिल्प संशोधन संस्थेचे सचिव डॉ. संजय पाईकराव यांनी केले.

शहरातील 'शहरनामा' टीमने रविवारी आपला दुसरा हेरिटेज वॉक व फोटो वॉक डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाजवळ असलेल्या औरंगाबाद लेणी समूहातील क्रमांक ६ ते १० येथे घेतला. इतिहास व पुरातत्व विभाग, एमजीएम विद्यापीठ, आख्यान फाऊंडेशन, गरवारे कम्युनिटी सेंटर, रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर ईस्ट आणि ॲडगाइड मीडिया प्रा. लि. व भारत पर्यटन, पर्यटन मंत्रालय, भारत सरकार

यांनी मिळून हा उपक्रम घेतला. यावेळी



गरवारे कम्युनिटी सेंटरचे संचालक सुनील सुतवणे, एमजीएम विद्यापीठाच्या इतिहास व पुरातत्व विभागाचे सहाय्यक प्रा. आशुतोष पाटील, ॲडगाइड मीडियाचे ओम परदेशी, रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर ईस्टचे अध्यक्ष निवृत्ती गजभारे, भारत पर्यटन विभागाच्या वरिष्ठ अधिकारी स्नेहल पाटील उपस्थित होत्या. डॉ. संजय पाईकराव यांनी औरंगाबाद लेणीचा इतिहास, कला, स्थापत्य आणि पुरातत्त्वीय वैशिष्ट्ये याकडे लक्ष वेधले. वारसा स्थळे समजून घेण्यासाठी त्यांच्या प्रेमात पडायला हवे. कलासक्त दृष्टीने बघितले तर औरंगाबाद लेणीतील शिल्प बोलकी वाटतात. औरंगाबाद लेणीचा उल्लेख कान्हेरीच्या लेण्यात येतो. या लेणीचा कालखंड साधारणपणे सहावे ते आठवे शतक सांगितला जातो. बेसॉल्टमधले हे शिल्प वैभव वरून खाली कोरण्यात आले. शिल्पातील आभूषणे, केशरचना अत्यंत कोरीव आहे. या लेणीतील काही शिल्प अजिंठ्याच्या शिल्पापेक्षाही सुंदर असल्याचे अभ्यासक म्हणतात. यात प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो तो लेणी क्रमांक सातमध्ये अवलोकितेश्वर बोधिसत्व हे शिल्प. यामध्ये अष्टभयां' पासून अवलोकितेश्वर बोधिसत्व रक्षण करतात अशी मान्यता आहे. अजिंठा, कान्हेरी, वेरूळ लेणींमधल्या अवलोकितेश्वरांपेक्षाही औरंगाबाद लेणीतील अवलोकितेश्वराचे शिल्प सर्वोत्तम मानले जाते. याच लेणीतील 'राजनर्तिका नृत्यशिल्पपट म्हणून प्रसिद्ध आहे. या शिल्पाकृतीकडे अभ्यासक आकर्षित होत असून हे शिल्प अत्यंत प्रभावी व स्त्री स्वातंत्र्याला अभिव्यक्त करणारे आहे, लेणी क्र. ६ च्या आधी एक लेणीचा शोध ६० घ्या दशकात डॉ. रमेश गुप्ते यांनी लावला. यास गणपती लेणी म्हटले जाते, असे संजय पाईकराव म्हणाले. शहरनामाच्या पहिल्या फोटो वॉकच्या विजेत्या मिनल निकम यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. तसेच सुधीर कोर्टीकर यांनी वेगवेगळ्या पक्ष्यांचे आवाज काढून दाखवले.



## डॉ.राजेश रगडे यांना राज्यस्तरीय "छत्रपती राजर्षी शाहू महाराज सामाजिक न्याय पुरस्कार २०२६" प्रदान

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – सामाजिक न्याय, समता आणि बंधुभावपूर्ण समाजनिर्मितीसाठी १९८१ पासून सातत्याने कार्य करणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील पर्यटन प्रशासन विभागाचे संचालक प्रा.डॉ. राजेश नारायण रगडे यांना मराठवाडा– खान्देश विभागातून राज्यस्तरीय "छत्रपती राजर्षी शाहू महाराज सामाजिक न्याय पुरस्कार २०२६" केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू हस्ते प्रदान करण्यात आला. या प्रसंगी समाजकल्याण मंत्री श्री संजय शिरसाठ, डॉ शरणकुमार लिंबाळे व पद्मश्री दादा इदाते यांची प्रमुख उपस्थिती होती

प्रा.डॉ. राजेश रगडे २०२१ मध्ये जागतिक मान्यता मिळालेल्या "आंबेडकर पर्यटन" या अभिनव संकल्पनेचे जनक आहेत. १९८१ मध्ये देशातील पहिली बाल भीम जयंती समिती, १९९९ मध्ये स्थापन झालेल्या प्रा राजेश रगडे मित्रमंडळा च्या माध्यमातून "दर रविवारी भगवान बुद्ध वंदन" ही नवीन प्रथा, १९९९ मध्ये गुटखाविरोधी जनजागरण अभियान, २००० मध्ये व्यसनमुक्ती अभियान, २०१५ पासून संविधान जनजागरण मोहीम, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अपरिचित पैलूंवर देश–विदेशात ४० हुन अधिक व्याख्याने अश्या विविध माध्यमातून सामाजिक परिवर्तन, संविधानिक मूल्यांचा प्रसार आणि शिक्षण, संशोधन व इतर कार्याच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांच्या सक्षमीकरणासाठी प्रा.डॉ. राजेश रगडे यांनी चार दशकांपासुन आंबेडकरी चळवळी मध्ये केलेल्या उल्लेखनीय सामाजिक कार्याचा हा गौरव आहे.

विवेक विचार मंच, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषद २०२६ महाड मध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रा.डॉ. राजेश रगडे यांच्या या सन्मानाबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# एकत्र कुटुंब हरवलं

ज्योतिर्मय साहित्य



एकत्र कुटुंब हरवलं की आधारही हरवतो लहानपणी घरात खूप माणसं होती, आजीचा मायेचा हात होता, आजोबांचा धाक होता काकांच्या हसण्यात आधार होता आणि काकूच्या प्रेमात दुसऱ्या आईची ऊब होती. त्या काळात घरात जागा कमी असली तरी मनं खूप मोठी होती.

एका माणसाला दुःख झालं की संपूर्ण घर अस्वस्थ व्हायचं आणि एका आनंदात संपूर्ण घर दिवाळीसारखं उजळून निघायचं.

आज आपण प्रगतीच्या अशा शिखरावर आहोत, जिथे माणसाकडे स्वतःचे हक्काचे घर आहे, बँक बॅलन्स आहे आणि सुखसोयींची सर्व साधने आहेत. पण या सगळ्यात एक गोष्ट खूप मागे सुटली आहे, ती म्हणजे आपले एकत्र कुटुंब.

आज आपण प्रायव्हसी आणि स्वातंत्र्य या नावाखाली वेगळे तर झालो, पण त्या बदल्यात आपण एकाकीपण पदरात पाडून घेतलं आहे. आजच्या चार भिंतींच्या ब्लॉक संस्कृतीत माणूस एका संकटानेही कोलमडून पडतो, कारण त्याला सांभाळून घेणारं कोणी नसतं. पैशाने नोकर मिळतील, पण आईसारखी काळजी करणारी काकू किंवा बाबांसारखा धीर देणारा मोठा काका विकत घेता येत नाही.

खरे तर, एकत्र कुटुंब हे एका मोठ्या वटवृक्षासारखे असते. वादळे कितीही आली, तरी एकत्र असलेल्या मुळांमुळे तो वृक्ष कधी कोलमडत नाही. आज हा



अमोल बोरीकर
छत्रपती संभाजीनगर
मो. 8624003013

वटवृक्ष तोडून आपण आपल्याच हाताने आपला आधार गमावून बसलो आहोत. हीच वेळ आहे विचार करण्याची; कारण नाती टिकली तरच माणूस टिकेल आणि माणसाला जगण्याचा खरा आधार मिळेल.

आज पैसा, करिअर, सुविधा सगळं आहे

पण दमलेल्या मनाला विचारणारं "काय रे, ठीक आहेस ना?"

हे वाक्य हरवत चाललंय

आज माणूस आर्थिकदृष्ट्या मजबूत असला तरी भावनिकदृष्ट्या कमकुवत होत चाललाय.

कारण संकटाच्या वेळी पैसा आधार देत नाही.

आधार देतात ती "आपली माणसं".

एकत्र कुटुंबात कदाचित जागा कमी असते पण मनाला मिळणारी सुरक्षितता खूप मोठी असते.

म्हणूनच, घर मोठं करण्यापेक्षा,

नाती मोठी ठेवणं जास्त महत्त्वाचं आहे.

"जिथे अनेक हात साथ देतात तिथे आयुष्याची ओझी हलकी होतात."



## सुभेदार रामजी मालोजी आंबेडकर माध्यमिक विद्यानिकेतन येथे रा.स्व. संघातर्फे वृक्षावरोपण

ज्योतिर्मय साहित्य

पुणे – रामवाडी येथील सुभेदार रामजी मालोजी आंबेडकर विद्यानिकेतन येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त संघाच्या कर्वेनगर येथील सह्याद्री प्रभात शाखा व भूमी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने शाळेच्या प्रांगणात वृक्षावरोपण करण्यात आले.जेष्ठ स्वयंसेवक उल्हास सावळेकर यांच्या पुढाकाराने झालेल्या या वृक्षारोपण कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थांना वृक्षावरोपणचे व वृक्ष संगोपनाचे महत्व सांगण्यात आले. नंतर शाळेच्या मैदानात पिंपळ, चिंच, चाफा, मोगरा या देशी रोपांचे वृक्षावरोपण करण्यात आले. याकामी संघाचे उल्हास सावळेकर, प्रकाश देशपांडे, प्रमोद कुलकर्णी, नंदकुमार कुलकर्णी, सुरेंद्र प्रधान तसेच भूमी संस्थेचे सावनी सावळेकर, साक्षी गुप्ता, धीरज मोरे, गायत्री पांगारे, जागृती पोवार, तन्वी शर्मा, अवनी मेढे, यांनी रोपे लावली. याप्रसंगी विद्यानिकेतनचे शाळा प्रमुख सुभाष वेताळ, सहाय्यक शिक्षिका वैशाली देवकाते, सहाय्यक शिक्षक भूषण जोशी, शिक्षक श्रीकृष्ण मुंढे, नीता पावडे, संगीता देवकर, कल्पना ढोले, आदेश नाईक यांचे सहकार्य लाभले.

हिंदू साम्राज्य दिन साजरा

३५२ वा शिवराज्याभिषेक दिन शाळेमध्ये साजरा करण्यात आला.याप्रसंगी संघाचे प्रकाश देशपांडे यांनी शिवराज्याभिषेक दिनाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमास उपस्थित विद्यार्थांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला.या प्रसंगी शाळेचे सर्व शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# ओळख साहित्यिकांची



मुकुंद भालेराव, 8308835313

व्यवस्थापन क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव, सातत्यपूर्ण विद्याभ्यास, संशोधनाची ओढ, साहित्यनिर्मिती आणि संस्कृतसेवा यांचा समन्वय साधणारे श्री. मुकुंद भालेराव हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित आहेत. उद्योगविश्वातील वरिष्ठ व्यवस्थापकीय जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळत असतानाच त्यांनी ज्ञानसाधना, अध्यापन, प्रशिक्षण, संशोधन आणि साहित्यनिर्मिती यांचा अखंड ध्यास जपला. व्यावसायिक यश आणि सामाजिक बांधिलकी यांचा समतोल साधत विविध क्षेत्रांत त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

त्यांचा जन्म विदर्भातील बुलडाणा जिल्ह्यातील चिखली येथे झाला. प्राथमिक शिक्षण पुणे महानगरपालिकेच्या शाळेत, तर माध्यमिक शिक्षण चिखली येथील आदर्श विद्यालयात झाले. त्यानंतर चिखली येथील शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला व वाणिज्य महाविद्यालयातून नागपूर विद्यापीठाची मराठी साहित्य विषयासह वाङ्मय स्नातक पदवी त्यांनी संपादन केली.

उच्च शिक्षणाची त्यांची वाटचाल सातत्याने विस्तारत गेली. पुणे विद्यापीठातून इतिहास विषयातील वाङ्मय पारंगत तसेच आंतरराष्ट्रीय राजकारण हा विशेष विषय घेऊन राज्यशास्त्रातील वाङ्मय पारंगत या पदव्या त्यांनी प्राप्त केल्या. त्यानंतर पुण्यातील आय.एल.एस. विधी महाविद्यालयातून विधी स्नातक (एल.एल.बी.) पदवी तसेच कामगार कायदे आणि करपद्धती या विषयांतील विशेष अध्ययन पूर्ण केले. पुढे बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून उत्पादन व्यवस्थापन आणि कामगार व्यवस्थापन या विषयांतील पदव्युत्तर पदविका संपादन केल्या. भारतीय व्यवस्थापन संस्था, अहमदाबाद येथे Organisation Development & Human Resource Development या विषयांतील विशेष प्रशिक्षण घेतले.

शिक्षणाची अखंड साधना पुढेही सुरू ठेवत त्यांनी सन २०२२ मध्ये बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून संस्कृत विषयातील एम.ए. पदवी संपादन केली.

साहित्य आणि संशोधन ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणखी दोन महत्त्वाची क्षेत्रे आहेत. मराठी, संस्कृत, हिंदी, उर्दू आणि इंग्रजी या भाषांमध्ये त्यांनी कविता, लेख, ब्लॉगलेखन आणि कथालेखन केले आहे. इंग्रजी कथांची पाच ई-पुस्तके प्रकाशित झाली असून फेब्रुवारी २०२६ मध्ये त्यांचा मराठी कवितासंग्रह 'अंतरातल्या नभात' प्रकाशित झाला. त्यांचा इंग्रजी कवितासंग्रह Ascending to Ambrosial 'Ascending to Ambrosial (Life Elixir) A Traveller of Mellifluous Symphony' प्रकाशनाच्या मार्गावर आहे. इंग्रजी भाषेतील ३०० डिजिटल महत्त्वाच्या क्रियापदांचा इंग्रजी-संस्कृत-मराठी-हिंदी शब्दसंग्रह 'आङ्ग्लसंस्कृतमराठीहिन्दीक्रियापदशब्दविशेषसङ्ग्रह' त्यांनी प्रकाशित केला आहे.

विविध विषयांवरील त्यांचे पाच संशोधन निबंध आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झाले आहेत. व्यवस्थापन, भाषा, संस्कृती आणि समाजजीवन या विषयांवरील त्यांचे चिंतनशील लेखन विविध माध्यमांतून प्रसिद्ध झाले आहे.

संस्कृत भाषा आणि भारतीय ज्ञानपरंपरेच्या प्रसारासाठी ते संस्कृत भारतीच्या कार्यात सक्रिय आहेत. संस्कृत संभाषण वर्ग, व्याख्याने, सांस्कृतिक उपक्रम आणि विविध प्रशिक्षण कार्यक्रमांद्वारे ते संस्कृतच्या प्रसारासाठी कार्यरत आहेत.

आकाशवाणीवरील त्यांच्या व्याख्यानांना तसेच 'संस्कृत आणि संगीत' या विषयावरील त्यांच्या विशेष मुलाखतीलाही रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे.



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'आई' (मायेची पैठणी)

कालच्या अंकावरून पुढे.....

जी स्त्री जन्माला येते, अशी प्रत्येक स्त्री 'बाई' होते; पण तिचे बाईपण 'आई' झाल्याशिवाय पूर्ण होत नाही. आणि त्यासाठी तिने मुलाला जन्म दिलाच पाहिजे अशी काही अट नसते, तिला फक्त 'आई' होता आलं पाहिजे, मायेचं पांघरूण घालता आलं पाहिजे. किंबहुना, आई होण्यासाठी स्त्री असण्याचीही अट नाही; ज्याच्या हृदयात सगळ्यांबद्दल प्रेम आणि कळवळा काठोकाठ भरला आहे, अशी कोणतीही व्यक्ती आई होऊ शकते.

पंढरपूरला विटेवर उभा असलेला पांडुरंग सर्व भाविकांचे, वारकऱ्यांचे दैवत. हा सावळा विठ्ठल काही करत नाही, काही बोलत नाही, काही देत नाही आणि घेतही काही नाही. पण तो 'विठू माउली' झाला. का बरं? कारण तो सगळ्यांचं दु:ख ऐकून घेतो, सगळ्यांना उराशी धरतो. त्याच्याजवळ कोणताच भेदभाव नाही. तो जरी बोलत नसला, तरी सगळ्यांना खात्री असते की "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे" असा आशीर्वाद प्रत्येकाला तो नक्कीच देतो.

"ऐशी कळवळ्याची जाती, करी लाभावीण प्रीती."

जिच्यामुळे हे विश्व निर्माण झाले अशी माता पार्वती जगज्जननी झाली. आमचे संत देखील 'माउली' झाले. समाजाने ज्यांचा अपार छळ केला, तरीही ज्यांच्या मुखातून विश्वाच्या कल्याणासाठी 'पसायदान' नावाचे अमृत बाहेर पडले, ते संत ज्ञानेश्वर म्हणूनच 'ज्ञानेश्वर माउली' झाले.

अहिल्याबाई होळकर लोकांसाठी समाजसेवेची अनेक कामे करून 'लोकमाता' झाल्या. अनाथ, निराधार मुलांवर मायेचे छत्र धरणाऱ्या सिंधूताई सपकाळ याच व्यापक मातृत्वाचे रूप झाल्या. ज्या आदीवासी, अशिक्षित स्त्रियांनी वृक्षांचे संवर्धन करण्यासाठी प्रसंगी आपल्या प्राणांचे बलिदान देऊन वृक्षांचे संरक्षण केले, त्या वृक्षमाता झाल्या. अशी मातेची अनेक रूपे.

आपल्या मुलांवर प्रेम करते ती 'आई'; सर्वांबद्दल प्रेमभाव जिच्या मनात असतो ती 'माता'; आणि अखिल विश्वाला कवेत घेणारी अपार माया जिच्या काळजात असते, ती 'माउली'!

"न मातु: पर दैवतम" असे आपल्याकडे म्हटले जाते; म्हणजेच आईसारखे दुसरे दैवत नाही.

क्रमश:.....

## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे



© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495



### "महाजनो येन गत: स पंथ:" ...

धारणाद्धर्ममित्याहुर्धर्मो धारयते प्रजाः।
यत्स्याद्धारणसंयुक्तं स धर्म इति निश्चयः॥ – महाभारत, कर्णपर्व

जो समाजाचे धारण-पोषण करतो, तोच धर्म होय.

या प्रसंगामुळे महाभारत हे केवळ युद्धकाव्य न राहता, मानवी नैतिकतेचे महान शास्त्र ठरते.

महाभारतातील सर्वात मोठी नीती – "अश्वत्थामा हतः... नरो वा कुंजरो वा"

■ द्रोणाचार्य वधाची संपूर्ण कथा

कुरुक्षेत्रातील युद्धाचा पंधरावा दिवस उगवला होता. भीष्म पितामह शरशय्येवर विसावले होते आणि आता कौरव सेनेचे नेतृत्व जगातील महान धनुर्धर, अस्त्र-शस्त्रांचे अद्वितीय ज्ञाता गुरु द्रोणाचार्य करत होते.

द्रोणाचार्य हे केवळ कौरवांचे सेनापती नव्हते, तर कौरव आणि पांडव या दोघांचेही गुरु होते. त्यांची युद्धकला इतकी अद्भुत होती की ज्या दिशेने त्यांचा रथ जाई, त्या दिशेने पांडवांची सेना गवताच्या काड्यांसारखी विखुरली जाई. त्यांच्या दिव्य अस्त्रांसमोर कोणताही योद्धा फार काळ टिकू शकत नव्हता.

भगवान श्रीकृष्ण यांनी पाहिले की, द्रोणाचार्य असेच युद्ध करत राहिले, तर पांडवांचा विजय अशक्य होईल. परंतु समस्या अशी होती की द्रोणाचार्यांना युद्धात पराभूत करणे जवळजवळ अशक्य होते. त्यांच्या मनाला तीव्र आघात बसल्याशिवाय ते शस्त्र खाली ठेवणार नव्हते.

तेव्हा श्रीकृष्ण म्हणाले–

"द्रोणाचार्यांना त्यांच्या पुत्र अश्वत्थामावर अत्यंत प्रेम आहे. जर त्यांना वाटले की अश्वत्थामा मरण पावला आहे, तर ते शोकाकुल होऊन शस्त्र त्याग करतील."

योगायोगाने कौरव सेनेत अश्वत्थामा नावाचा एक विशाल हत्तीही होता. श्रीकृष्णांच्या योजनेनुसार भीमसेन त्या हत्तीपाशी गेले आणि आपल्या प्रचंड गदेच्या प्रहाराने त्याचा वध केला. हत्ती कोसळताच भीमसेन मोठ्याने ओरडले - अश्वत्थामा मेला! अश्वत्थामा मेला! क्रमशः...

# साहित्य-प्रवासाची फलश्रुती

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

सर्वांना नमस्कार-


स्टेट बँक ऑफ हैदराबाद या एसबीआय मध्ये विलीन झालेल्या बँकेत फेब्रुवारी- १९७३ ते जून-२००६ अशी ३३ वर्षे -४ महिने मी नोकरी केली. या ३३ वर्षतली १९८६ ते २००६, अशी अख्खी २० वर्षे म्हणजे तब्बल दोन दशके मी माझ्याच गावी परभणीला काम केले ते

१. एडीबी - कृषी विकास शाखा - नवा मोंढा, परभणी, १९८६ ते १९९६ अशी १० वर्ष, या पुढची-

२. १९९६ ते २००३ - ही सात (७) वर्षे त्यावेळच्या

मराठवाडा कृषी विद्यापीठ परिसरातील मकृवि -एमकेव्ही शाखेत काम केले.. आणि..

३. २००३ ते जून-२००६ ही तीन वर्षे - एसबीएच च्या - परभणी मुख्य शाखेत स्पेशल असिस्टंट या पदावर कार्यरत असतांना, ३० जून २००६ रोजी मी स्वेच्छानिवृत्ती घेतली.




''स्वेच्छा-निवृत्तीची - व्हीआरसची कोणतीही स्कीम नसतांना, माझ्या मनाच्या इच्छेनुसार मी निवृत्त झालो'', त्या वेळी माझ्या नोकरीतला ४८-महिने सेवाकाल शिल्लक होता, तरीही ''मनोमन संकल्प केल्याप्रमाणे ३० जून २००६ ला रिटायर झालो.

आणि ०२ जुलै २००६ पासून माझ्या जीवनातले ''पुणे -निवास- पर्व'' सुरू झाले.

या स्वेच्छा-निवृत्तीत खूप मोठे आर्थिक नुकसान आहे'' हे जाणून घेऊन ही, माझ्या निर्णयास माझ्या ''पत्नीने, मुलाने, कन्येने ''स्वीकारले'', हा त्यांच्या मनाचा मोठेपणा'', मला सदैव वंदनीय आहे.

मित्र हो- स्वेच्छा-निवृत्तीचा विचार प्रबळ होण्यासाठी, निर्णय ठाम होण्यासाठी'' माझ्यातील ''लेखक-, कवी मनाने'' मला खंबीर साथ दिली. त्या सोबतीने मी आज साहित्यिक क्षेत्रात इंटरनेट विश्वात ''लोकली-ग्लोबल'' साहित्यिक होऊ शकलो आहे.

१९८३ पासून माझा सातत्यपूर्ण लेखन प्रवास सुरु झालाय त्याला आता चार दशकं, आणि ४४ वर्षे झालीत. नोकरीत असतांनाच ''कथासंग्रह आणि बालसाहित्य, व कविता संग्रह'' या लेखनाची २५ पुस्तक २००६ पर्यंत प्रसिद्ध झाली.

पुढे पुण्यात आल्यावर २००७-०८-०९ या तीन वर्षात आणखी काही पुस्तके आली.

चमत्कार घडला तो २०११ पासून, इंटरनेट विश्वातील ''फेसबुक, जी मेल, साहित्यिक संस्था, वेबसाईट'' यांच्याशी मी जोडला गेलो ''ई साहित्य, ई बुक्स, ऑडिओ बुक्स, युट्युबवर साहित्यवाचन, फेसबुल लाईव्ह सादरीकरण, फेसबुक - इन्स्टाग्राम वर रिल्स सादरीकरण, तसेच साहित्यिकांच्या पुस्तकांना प्रस्तावना'', फेसबुक ग्रुप्सचे मेळावे, साहित्य सम्मेलने'', यात अध्यक्ष, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित, अशा विविध स्वरूपात माझे साहित्यिक उपक्रम चालू आहेत.

यात भर पडली ती ''हिंदी काव्य लेखनाची'', उत्तर भारतातील अनेक हिंदी साहित्य विषयक संस्था, ग्रुप्सचा मी कवी-लेखक झालोय.

२०२३, २०२४,२०२५ या तीन वर्षांत

१.तितिक्षा जीवन गौरव पुरस्कार,

२. सर्वद जीवन गौरव पुरस्कार,

३. युगधंरा प्रतिष्ठान- साहित्य शिरोमणी पुरस्कार,

४. महाकवी कालिदास प्रतिष्ठान- महाकवी कालिदास काव्य-पुरस्कार,

५.वाचन साखळी समूह - वाचनयात्री पुरस्कार,

६.एस फोर सोल्यूशन- साहित्यरत्न पुरस्कार,

७.आम्ही पुण्यातील परभणी कर - संस्थेचा ''परभणी भूषण पुरस्कार'',

८.नव उदय पत्रिका ग्वालीयर- संत मीराबाई साहित्य सन्मान, आणि माझे आबा आजी, पावसाचे गाणे, मला कवीचा चष्मा लागला '' या पुस्तकांना विविध साहित्य पुरस्कार प्राप्त,

असे मान-सन्मान, बहुमान '' हे या निवृत्ती-पर्वातील ठळक आनंदाचे क्षण वाट्याला आलेत.

२०२५ पर्यंत माझ्या प्रकाशित पुस्तकांची संख्या-

एकूण प्रसिद्ध पुस्तके - संख्या- ८० ,

यात प्रिंट बुक्स- ४७ , ई-बुक्स -३३ = अशी ८०

पुस्तके अशी झाली आहे.

अध्यात्मिक काव्य-लेखन २०२१ ते २०२६ अशी सलग पाच वर्षे दर गुरुवारी एक रचना या प्रमाणे संपन्न झाले.

१.श्री गोंदवलेकर महाराज काव्य-चरितावली १११ काव्य-रचना.

२.श्री गजानन विजय काव्यांजली - १३६ काव्य-रचना,

३. श्री स्वामी समर्थ भ्रमण-गाथा -काव्य-वंदना ७२ काव्यरचना.

४.श्री स्वर्वेद ग्रंथ -विहंगम योग साधना- लेखन उपक्रम

हे लेखन उपक्रम श्री सद्गुरुंच्या कृपेने ग्रंथ स्वरूपात

अर्पण करण्याची तयारी सुरू केली आहे.

माझ्या वाचकांचे,तुम्हा मित्रांचे सततचे प्रोत्साहन,

या बळावर वाटचाल सुरू आहे. तुम्हा सर्वांचे मनापासून आभार .

काही नवी पुस्तके लवकरच तुमच्या भेटीस येत आहेत, नेहमीप्रमाणे स्वागत करावे. थँक्यु दोस्त, तुमच्यामुळे ३० जून हा '' रिटायरमेंट दिवस'', आठवला, लोभ व मैत्री अशीच असू द्यावी.

# रा. स्व.संघ सह्याद्री प्रभात कर्वेनगर शाखेतर्फे ३५२ वा शिवराज्याभिषेक दिन साजरा

## छत्रपती शिवराय; राष्ट्रचेतना व अस्मितेचे प्रतिक-विंग कमांडर अविनाश मुठाळ (नि.)

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

पुणे - तिथीने शुद्ध त्रयोदशी म्हणजेच २७ जून रोजी विविध ठिकाणी संपन्न होणारा शिवराज्याभिषेक दिन म्हणजेच हिंदू साम्राज्य दिन हा केवळ उत्सव नसून तो या भूमीचा राजकीय व सामाजिक अस्मितेचा हुंकार आहे''.इंग्रजी तारखेचा परका चष्मा नाकारून सूर्य - चंद्राच्या गतीवर आधारित चांद्र - सौर कालगणनेनुसार साजरा होणारा मूळ उत्सव.'' असे उद्गार विंग कमांडर अविनाश मुठाळ (निवृत्त) यांनी काढले.ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कर्वेनगर येथील सह्याद्री प्रभात शाखेच्या वतीने आयोजित शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित सोहळ्यात बोलत होते.राष्ट्रीय चेतना म्हणजेच विखुरलेल्या समाजाला एका सूत्रात बांधून हिंदवी स्वराज्याच्या सुशासनाचे मापदंड अधोरेखित करणारा सुवर्णकाळ असल्याचेही ते



पुढे म्हणाले.''छत्रपती शिवाजी महाराज हे भारतीय इतिहासातील असे महान आणि यशस्वी सम्राट आहेत की ज्यांची स्मृती केवळ वर्तमानातच नव्हे तर येणाऱ्या असंख्य पिढ्यांपर्यंत टिकून राहील व त्यांचे कार्य हे भारतीय अस्मिता,स्वाभिमान आणि राष्ट्र उभारणीची एक अमरगाथा म्हणून सदैव स्मरणात राहील''

कर्वेनगर हाऊसिंग सोसायटीच्या उद्यानासमोर हा सोहळा आयोजित केला होता.यामध्ये सोसायटीचे

नागरिक,स्वयंसेवक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात झाली.उपस्थित नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना विनम्र अभिवादन केले.

कार्यक्रमाच्या सुरवातीस कर्वेनगर येथील सह्याद्री प्रभात शाखेचे सह मुख्यशिक्षक प्रकाश देशपांडे यांनी प्रमुख पाहुणे माननीय संघचालक (संभाजीभाग) अनिल व्यास यांचा व वक्ते विंग कमांडर अविनाश मुठाळ यांचा उपस्थितांना परिचय करून दिला. योग शिक्षक सुभाष फडके यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचेवर ''हा धन्य धन्य शिवराय'' गीत सादर केले.

# फोडणारे खूप झालेत, जोडणारे कधी होणार?

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

फोडणारे खूप झालेत, जोडणारे कधी होणार? हा केवळ एक प्रश्न नाही, तर आजच्या आधुनिक, गतिमान आणि काहीशा विस्कळीत समाजाने स्वतःला विचारलेला एक आर्त टाहो आहे. आज आपण अशा युगात जगत आहोत जिथे तंत्रज्ञानाने जग जवळ आणले आहे, पण माणसांमधील अंतर मात्र वाढवले आहे. घर असो, समाज असो, राजकारण असो की आंतरराष्ट्रीय संबंध, प्रत्येक ठिकाणी फोडणे, विभक्त करणे किंवा दुरावा निर्माण करणे खूप सोपे झाले आहे. पण या सगळ्या पार्श्वभूमीवर मनांना, विचारांना आणि माणसांना जोडणारे हात कुठे आहेत? हाच आजचा सर्वात मोठा यक्षप्रश्न आहे.



आज आपल्या आजूबाजूला नजर टाकली तर असे दिसते की, तोडणाऱ्यांची किंवा फोडणाऱ्यांची एक मोठी फौज उभी आहे. पूर्वी एकत्र कुटुंबपद्धती ही आपल्या संस्कृतीची ताकद होती. सुख-दुःखात एकमेकांचा आधार असणारी माणसे आता स्मार्टफोन आणि वैयक्तिक स्पेस च्या नावाखाली विभक्त होत आहेत. छोट्या-छोट्या चुकांवरून किंवा अहंकारापोटी वर्षानुवर्षांचे संसार आणि नाती सेकंदात मोडीत निघत आहेत. जाती-पाती, धर्म, भाषा आणि राजकीय विचारसरणीच्या नावावर समाजाचे तुकडे केले जात आहेत. निवडणुका जिंकण्यासाठी किंवा स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी समाजात द्वेषाची बीजे पेरणे आज अत्यंत सोपे झाले आहे. सोशल मीडिया हे तर याचे मुख्य केंद्र बनले आहे, जिथे एका चुकीच्या पोस्टमुळे दंगली भडकतात आणि वर्षानुवर्षांचे सामाजिक सलोख्याचे पूल कोसळतात. आज माणसाला माणसावर विश्वास राहिलेला नाही. संवाद संपला आहे आणि त्याची जागा वाद आणि अपवादाने घेतली आहे. कोणाचे तरी घर फोडणे, कोणामध्ये तरी भांडण लावणे यात लोकांना एक विकृत आनंद मिळताना दिसतो. ''काच फुटली तर आवाज होतो, पण मन फुटले तर अथांग शांतता पसरते जी समाजाला आतून पोखरत जाते.''




फोडण्यासाठी ताकदीची किंवा कुटिल बुद्धीची गरज असते, पण जोडण्यासाठी हृदयाची आणि सामंजस्याची गरज असते. जोडणारा माणूस हा समाजाचा खरा शिल्पकार असतो. इतिहास साक्षी आहे की, ज्या समाजाने किंवा राष्ट्राने जोडण्याचे काम केले, तेच टिकून राहिले. छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जातींच्या लोकांना एकत्र जोडून स्वराज्य निर्माण केले. महात्मा गांधींनी संपूर्ण देशाला एका विचाराने जोडले आणि आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले. संतांनी आपल्या अभंगांतून माणसाला माणसाशी आणि माणसाला ईश्वराशी जोडण्याचे काम केले.

**(क्रमशः)**

# वक्त ने किया क्या हसीं... सितम....

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आम्ही आनंदयात्री आयोजित 'वक्त ने किया क्या हसीं... सितम....' या नावाचा स्वर्गीय गुरुदत्त आणि गीता दत्त यांना गीताव्दारे आदरांजली देण्याचा हिंदी चित्रपट गीतांचा कार्यक्रम रविवार दिनांक २७ जून रोजी न्यू इंग्लिश स्कूलच्या सभागृहात संपन्न झाला. आखिया भूल गयी है सोना हे विजय भट्ट यांनी दिग्दर्शन केलेल्या गुंज उठी शेहनाई चित्रपटातील गाणे विजया चव्हाण आणि प्रिया अघोर या दोघी गायिकांनी सादर केले. सूत्रसंचालन करणाऱ्या ॲड. स्नेहल कुलकर्णी म्हणाल्या... विजया चव्हाण यांनी मला सांगितले कि, हे गाणे वाई येथील मेणवली परिसरात चित्रीत करण्यात आले आहे. हे ऐकल्यावर माझ्या शेजारी बसलेले ज्येष्ठ पत्रकार, सिनेअभ्यासक मुकुंद फडके मला म्हणाले, संगीतकार वसंत देसाई यांनी या गाण्याला संगीत दिले असून गीता दत्त आणि लता मंगेशकर यांनी हे गाणे म्हंटले आहे. तसेच या गाण्याचे चित्रीकरण हे संगम माहुली येथे पण झाले आहे. गाणे सादरीकरण पूर्ण झाले आणि अचानक अशोक वाळिंबे यांनी माईक घेऊन या गाण्याच्या चित्रीकरणाच्या संदर्भातील संगम माहुली सातारा येथील आठवणी अभिमानाने सांगितल्या. माझ्या लक्षात आले कि, जेव्हा कोणत्याही बाबतीत साताऱ्याचा उल्लेख येतो तेंव्हा सातारकर म्हणून आपला ऊर भरून येतो. साताऱ्याची व्यक्ती देशात-परदेशात कुठेही असली तरी सातारकर म्हणून अभिमानाने मिरवत असते. शाहू महाराजांच्या या राजधानीचा सातारकर म्हणून प्रत्येकाला अभिमान असतो. गुंज उठी शेहनाई या चित्रपटाचे बहुतेक चित्रीकरण संगम माहुली सातारा आणि मेणवली घाट वाई येथे पार पडले. विशेषतः गाण्याचे शूटिंग माहुलीला झाले. या चित्रपटात विनोदी पात्र आय एस. जोहर हे आहे. हरवलेले एक नाणे शोधण्याचा एक प्रसंग आहे त्याचे शुटिंगही माहुलीला झाले. माहुलीचे मुख्य मंदिर येथे राजेंद्रकुमार हे सनई वाजवतानाची अनेक दृश्ये आहेत. हा चित्रपट राजेंद्रकुमार यांचा पहिला हिट चित्रपट होता. साताऱ्याचा संगम माहुली आता चित्रीकरण करण्याचा हॉट स्पॉट झाला आहे. अनेक मालिकांचे चित्रण येथे झाले आहे. सध्या झी मराठीवर कृष्णाईच्या लेकी आणि स्टार प्रवाह वर सुना येती घरा या मालिकांचे चित्रण संगम माहुली येथे सुरु आहे.



या घटनेवरून मला ७१ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन जे सातारा येथे २८, २९, ३० डिसेंबर १९९० रोजी संपन्न झाले त्याची आठवण झाली. ज्येष्ठ नाट्यसमीक्षक माधव मनोहर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या संमेलनात शाहीर साबळे साताऱ्यात आठ दिवस मुक्कामाला होते. मदन भोसले यांच्याबरोबर काम करीत असताना शाहीर साबळे यांनी साताऱ्याच्या सांगितलेल्या आठवणी मला अजुनही आठवतात. या नाट्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष प्रतापराव भोसले होते. नाट्य परिषद साताऱ्याचे अध्यक्ष सुरेश पळणिटकर होते तर मी कार्यवाह होतो. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा-सातारा संयोजक असल्याने संपूर्ण संमेलनाच्या आयोजनामध्ये आमचा सहभाग होता. कृष्णराव गणपतराव साबळे (शाहीर साबळे) याचा जन्म ३ सप्टेंबर १९२३ रोजी सातारा जिल्ह्यातील पसरणीचा. शेतकरी, वारकरी कुटुंबात वाढल्यामुळे भजन-कीर्तन, ओव्या आणि लोकपरंपरेचा वारसा शाहीर साबळे यांना लहानपणापासून मिळाला. स्वातंत्र्य चळवळीत शाहीर साबळे यांनी साने गुरुजींबरोबर प्रचार-दौरे केले आणि शाहिरीच्या माध्यमातून लोकांमध्ये राष्ट्रभावना जागृत केली. १९४२ च्या स्वातंत्र्यचळवळीपासून हैद्राबाद मुक्तिसंग्रामापर्यंत त्यांनी गीते, पोवाडे आणि प्रहसने यांचा वापर करून जनमत तयार केले.

स्वातंत्र्य मिळेपर्यंत देशभक्तीने प्रेरित होऊन शाहीर साबळे शाहिरी करत होते. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांना आर्थिक स्थैर्याची नितांत आवश्यकता होती. त्यासाठी त्यांनी वाईत एक कार्यक्रम घेतला होता. तो कार्यक्रम त्यावेळचे कमिशनर खान यांनी ऐकला आणि शाहीर साबळे यांना घेऊन ते क्रांतिवीर किसनवीरांकडे गेले. किसनवीर काँग्रेसचे जुने जाणते कार्यकर्ते आणि सातारा शहराचे नेतेही होते. स्वातंत्र्यानंतर निरनिराळ्या सरकारी योजना जनतेसाठी राबवल्या जात होत्या. त्यातली सर्वश्रेष्ठ योजना दारूबंदी. ही योजना सातारा शहरात राबविण्यासाठी शाहीर साबळे यांना त्यांनी आमंत्रित केलं होतं. शाहीर साबळे यांनाही पोटापाण्यासाठी काही उद्योग हवाच होता. समाजजागृती करता करता शाहीर साबळे यांच्या कुटुंबाला आर्थिक हातभार लागणार असल्याने ही जबाबदारी स्वीकारत ते साताऱ्यात येऊन १९४९ साली मिलिटरी कॅम्पातल्या कल्याणी बराकीत वास्तव्याला राहिले. त्याकाळात कर्मवीर भाऊराव पाटीलही त्यांच्या शेजारीच रहात होते. साताऱ्यात आणि आजूबाजूच्या परिसरात शाहीर साबळे यांचे कार्यक्रम होऊ लागले. त्यांच्या कार्यक्रमात असणारा राजकीय संदर्भ, सामाजिक जाणीव आणि त्यांचा चांगला आवाज यामुळे शाहीर साबळे लवकरच प्रसिद्धीच्या झोतात आले. साताऱ्यात शिवराज मेळा उत्सवातून कार्यक्रम होत असत. शाहीर साबळे यांनी या मेळ्यासाठी प्रहसने लिहून दिल्याने हळूहळू साताऱ्यातले नवोदित कलावंत त्यांच्या अवती-भवती जमा होऊ लागले. पी.जी.पाटील, दत्ता वाळवेकर, कारंजकर, पी. अनंत हा त्यांचा त्यावेळचा ग्रुप होता. साताऱ्यातील चांगल्या मित्रांमुळे त्यांच्या सानिध्यात साबळे यांच्या विचारांची व्यापकती वाढली.




१९४९ ते १९५१ ही दोन वर्षे शाहीर साबळे आपल्या कुटुंबासह साताऱ्यात होते. हळूहळू काँग्रेसच्या राजकारणात बदल घडायला लागल्याचे ते आम्हाला त्यावेळी सांगत होते. दारूबंदीसारखा समाजाला व्यसनमुक्त करणारा कार्यक्रम राबवणं हळूहळू सोडून देण्यात आल्याने त्यांच्याकडे असणारे काम बंद झाले आणि त्यांना सातारा सोडावा लागला. पण आयुष्यभर ते साताऱ्याचा उल्लेख सर्व ठिकाणी करीत असत. शाहीर साबळे म्हणत... मी खेड्यात वाढलेला एक माणूस, माझी बौद्धिक क्षमता माझ्या आजूबाजूच्या वातावरणापुरता विचार करण्याइतकीच मर्यादित होती. साताऱ्याने त्याला व्यापक स्वरूप दिले, आत्मविश्वास दिला, लिखाणातली सफाई दिली. चांगले वाचण्याची, चांगले ऐकण्याची लालसा मनात निर्माण केली. अनेक अनुभवातून माणूस घडतो. मला घडवण्यात साताऱ्यात आलेले अनुभवही प्रभावी ठरले. पुढील काळात मी काम केलं ते काँग्रेसमधल्या चांगल्या माणसांसाठी, चांगल्या विचारांसाठी.सातारा सोडल्यावर पुन्हा एकदा नव्या उमेदीनं, नव्या कामाचा शोध घेण भाग होत, पण मनात साता-याबद्दल साठविलेल्या आठवणी आणि त्यातून मिळालेला आत्मविश्वास भरपूर होता. त्या शिदोरीवर मी पुढे कलाप्रांतात पार पुढे निघून गेलो.

अशा गोष्टी साता-याबद्दल विविध मान्यवरांच्या आपण ऐकतो तेव्हा आपल्याला जो आनंद मिळतो त्याने आपल्याही साताऱ्यातील जुन्या आठवणी जागा होत्यात. अशा आठवणीच मनात आनंदझरा निर्माण करून नव्या उमेदीने साताऱ्यात वेगवेगळे उपक्रम करण्यासाठी आपल्याला स्फूर्ती आणि आत्मविश्वास देतात.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559